इ) लिहुन देणार यांना अश्या प्रकारे सदरची मिळकत तबदील करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे.

ई) सदरील बांधीव मिळकतीस देण्यात येणाऱ्या सुविधा कराराच्या परीशिष्टानुसार असतील.

18) खर्च :- कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे हस्तांतरणाकामी तसेच प्रस्तुतचा करारनाम्याचा संपुर्ण खर्च जसे लिहिणावळ, नोंदणावळ व वकील फी इत्यादी लिहुन घेणार यांनी सोसला आहे. तसेच कलम 1ब मधील मिळकतीचा अंतिम हस्तांतरणाचा खर्च करण्याचे अंगिकारले आहे.सदरचे करारनाम्याचा व अंतिम हस्तांतरण कामी येणारा खर्च लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांचेकडे सदरचे दस्त तयार करणेपुर्वी द्यावयाचा आहे.

19) कागदपत्रे :- लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना सदर करारनाम्यासोबत 7/12 उतारा, बांधकाम परवानगी, मंजुर लेआऊट प्लॅन, इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति दिलेल्या असुन कम्प्लीशन व कब्जापत्र देण्याचे मान्य केले आहे सदरचा करारनामा लिहुन घेणार यांनी सही करण्यापुर्वी वाचुन व समजुन घेतलेला आहे.

परीशिष्ट ब

मिळकती मधील सुविधा

1. इमारत आर.सी.सी. स्टक्चरमध्ये
2. चांगल्या प्रतीच्या विटांचे बांधकाम , बाहेरील भिंत,6" व इतर भिंती 4" जाडीच्या असतील.
3. पुर्ण रुम मध्ये स्पार्टेक,12इंच बाय 12इंच लॉबीमध्ये व जिन्यामध्ये मार्बल स्टेप टाईल फ्लोरींग
4. मेनदरवाजा फ्रेम मलेशियावुडमध्ये, सर्व दरवाजे फ्लॅश डोअर्स असतील.
5. खिडक्या या टु टॅक स्लायडींग विंडो असतील.

6. इलेक्ट्रीक फिटिंग ही ओपन पट्टी पध्दतीने असेल.
7. सर्व प्लबिंग ही स्टॅन्डर्ड प्रकारची असेल तसेच प्रत्येक बाथरुममध्ये एक कॉक व एक शॉवर असेल
8. बाथरुममध्ये 7 फुट लेव्हल पर्यत व संडास मध्ये डॅडो 4 फुटा पर्यत ग्लेझ्ड 10 बाय 13 इंच टाईल्समध्ये.
9. किचनओटा ग्रिन मार्बल पध्दतीचा व त्याला राउंड स्टिल सिंक, किचन ओट्यावर 7 फुट उंची पर्यत डॅडोट ग्लेझ्ड टाईल्समध्ये
10. बिल्डींगमध्ये 24 तास पाण्याच्या सोयीसाठी तळजल्यावर एक अंडरग्राउंड पाण्याची टाकी व बिल्डींगचे वर एक कॉमन टाकी बांधणेत येईल व त्यात पाणी हे महानगर पालिकेच्या कनेक्शनमधुन देण्यात येईल.
11. ईमारतीचे बाहेरचा रंग सिमेंट पेंटमध्ये व आतील रंग डिस्टेंबर मध्ये तसेच सर्व दरवाजे खिडक्यांच्यां चौकटी या ऑईल पेंटमध्ये पेंट केलेले असतील, कॉमन टेरेस हे स्पेशल वॉटर प्रुफिंग करुन दिले जातील.
12. वाहन तळासाठी चेकर्स मोजेक टाईल्स बसविले जातिल.
13. लिफ्ट बॅटरीअप सह

येणेप्रमाणेचा सदरचा फ्लॅट विक्री करारनामा लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी आजरोजी राजीखुशीने, स्वसंतोषाने, कोणाचेही कोणत्याही प्रकारचे धाक दडपणास बळी न पडता, मुक्त संमतीने, दोन साक्षीदारांसमक्ष लिहुन व नोंदवुन ठेवला आहे.

हा फ्लॅट विक्री करारनामा

नाशिक .तारीख / / 2018

श्री.

लिहुन घेणार

Scanned by CamScanner